माहितीचा अधिकार

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये
प्राप्त झालेले व्दितीय अपील

तक्रार क्रमांक : १२२/२०२४

तक्रारकर्ता	प्रतिवादी	
	जन माहिती अधिकारी	**प्रथम अपीलीय अधिकारी**
सौ. कल्पना देविदास वाघमारे, वार्ड क्र.१, आलापल्ली, ता. अहेरीजि. गडचिरोली - ४४२७०३	कार्यालय अधिक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली, ता. अहेरी जि. गडचिरोली - ४४२७०३	सहायक वनसंरक्षक (तेंदु), आलापल्ली वनविभाग, आलापल्ली, ता. अहेरी जि. गडचिरोली - ४४२७०३

अंतरिम आदेश दिनांक : १७.०२.२०२६

अंतीम आदेश दिनांक : २२.०९.२०२६

निर्णय

तक्रारकर्ता, श्रीमती कल्पना देविदास वाघमारे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अंतर्गत आयोगात दाखल केलेल्या व्दितीय अपील क्र. १९८८/२०२१ मध्ये दिनांक ०६.०६.२०२३ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. त्यानुषंगाने सदर तक्रार अर्जावर आयोगाने दिनांक १७.०२.२०२६ रोजी सुनावणी घेऊन पुढीलप्रमाणे अंतरिम आदेश पारित केले आहे.

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली, ता. अहेरी जि. गडचिरोली यांनी (अपील क्र. १९८८/२०२१) दिनांक ०६.०६.२०२३ रोजी पारित केलेल्या आदेशाचे तंतोतंत पालन करुन आयोगाचे आदेश प्राप्त होताच ७ दिवसात तक्रारकर्त्यास तात्काळ विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी व त्याची पोच आयोगास सादर करावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली, ता. अहेरी जि. गडचिरोली यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगास सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसात सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

सदर आदेशाची प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना पोहचेल, याबाबतची विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी खातरजमा करावी.

३) **या आदेशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

आयोगाचे उपरोक्त आदेश दिनांक ०५.०३.२०२६ रोजी निर्गमित करण्यात आले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, सामाजिक वनीकरण वृत्त नागपूर, श्री. आर. एस. सुकारे यांनी दिनांक ०२.०४.२०२६ रोजीच्या पत्रान्वये आयोगाकडे पुढीलप्रमाणे लेखी खुलासा सादर केलेला आहे.

"मी रवींद्र माधव सुकारे, कार्यालय अधीक्षक भामरागड वनविभाग भामरागड या पदावर दिनांक १५.१२.२०२१ ते दि. ३०.०६.२०२५ पर्यंत कार्यरत होतो. त्या दरम्यान श्री. राठोड, कार्यालय अधीक्षक आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांची बदली पुसद वन विभागात झाली. त्यामुळे कार्यालय अधीक्षक आलापल्ली वनविभाग आलापल्ली या पदाचा अतिरिक्त कार्यभार मी दिनांक ०५.०६.२०२२ पासून दिनांक ३०.०६.२०२५ पर्यंत सांभाळला आहे. त्यानंतर माझी बदली नागपूर येथे सध्याचे कार्यालयात झाल्याने मी कार्यालय अधीक्षक आलापल्ली वनविभाग आलापल्ली या पदाचा अतिरिक्त कार्यभार दिनांक ३०.०६.२०२५ रोजी सौ. निकीता कन्नमवार, मुख्य लेखापाल, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांना सोपवून कार्यमुक्त झाले आहे. दिनांक ३०.०३.२०२६ चे पत्रान्वये प्राप्त माहितीचे आधारे सादर करण्यात येते की, सौ. कल्पना देवीदास वाघमारे, आलापल्ली यांनी दिनांक २४.०२.२०२१ रोजी श्री. राठोड, कार्यालय अधीक्षक तथा जन माहिती अधिकारी आलापल्ली यांचेकडे माहिती प्राप्त करण्यास अर्ज केला होता. सदर प्रकरणी माहिती ही सर्वे कक्षातील कक्ष प्रमुखाशी संबंधीत असल्याने श्री. राठोड, तत्कालीन कार्यालय अधीक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांनी त्यांचे पत्र क्र. ३३६, दि. २६.०२.२०२१ अन्वये सर्वेअर, कक्ष प्रमुख सर्वे कक्ष यांचेकडे नियम ५(४) अंतर्गत त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास अर्ज पाठविले आहे. सर्वेअर, कक्ष प्रमुख सर्वे कक्ष यांनी त्यांचे पत्र क्र. २२, दि. १६.०३.२०२१ अन्वये अर्जदारास अर्जातील दोन मुद्दयांचे माहितीपैकी मुद्दा क्र. १ ची माहिती श्री. राठोड, कार्यालय अधीक्षक तथा जन माहिती अधिकारी आलापल्ली यांना उपलब्ध करुन दिली आहे. सदर माहिती अर्जदारास पत्र क्र. ३४१, दि. १८.०३.२०२१ अन्वये विनामुल्य पुरविण्यात आली आहे.

सदर प्रकरणी त्यानंतर अपिलार्थी यांनी दिनांक ३१.०५.२०२१ रोजी कलम १९(१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९.०६.२०२१ रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांचे दिनांक २४.०२.२०२१ रोजीचे अर्जातील मुद्दा क्र. १ ची माहिती पुरवठा केलेला असून मुद्दा क्र. २ ची माहिती ३ दिवसात अपिलार्थीस पुरविण्यात यावी, असे आदेशित करुन अपील निकाली काढले आहे. त्यावेळी श्री. राठोड, कार्यालय अधिक्षक तथा जन माहिती अधिकारी, आलापल्ली तसेच सर्वेअर, कक्ष प्रमुख सर्वे यांनी अर्जदारास माहिती देणे अपेक्षीत होते, परंतु त्यांनी प्रथम अपील आदेशाचे पालन केलेले नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे दिनांक १६.०९.२०२१ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. त्यावर दिनांक ०६.०६.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९.०६.२०२१ रोजी पारित केलेल्या आदेशाप्रमाणे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तात्काळ अंमलबजावणी करीत

अपिलार्थीस मुद्दा क्र. २ ची माहिती कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध असल्यास तात्काळ विनामुल्य अपिलार्थीस पुरविण्याच्या निर्देशासह दिनांक ०६.०६.२०२३ चे आदेशान्वये प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात आले आहे. सदरचे आदेश पारित झाल्याचे तारखेला माझेकडे कार्यालय अधीक्षक तथा जन माहिती अधिकारी आलापल्ली या पदाचा अतिरिक्त कार्यभार होता. परंतु आपले आदेश दिनांक ०६.०६.२०२३ चे उपवनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांचे कार्यालयात प्राप्त न झाल्याने ते माझ्या निदर्शनास आले नाही. त्यामुळे सदर आदेशाची अंमलबजावणी झालेली नाही. सदरची बाब कार्यालय अधीक्षक तथा जन माहिती अधिकारी, आलापल्ली यांनी दिनांक ३०.०३.२०२६ चे पत्रान्वये खात्री करुन मला अवगत केली आहे.

अशा प्रकारचे सदरचे प्रकरण हे सन २०२१ चे असल्याने व मी जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, आलापल्ली या पदाचे अतिरिक्त कार्यभार सांभाळत असतांना आयोगाचे दिनांक ०६.०६.२०२३ रोजीचे आदेश कार्यालयात प्राप्त न झाल्याने त्याचे अनुपालन करणे शक्य झालेले नाही. तसेच सदरचे दिनांक ०६.०६.२०२३ चे आदेश अर्जदारास प्राप्त झाल्यावरही त्यांनी माहितीसाठी कार्यालयात विचारणा केलेली नाही. त्यामुळे त्या प्रकरणाशी मी पूर्णपणे अनभिज्ञ राहीलो. सबब, तक्रारकर्ता, श्रीमती कल्पना देवीदास वाघमारे, आलापल्ली यांनी मागितलेली माहिती त्यांना पुरविता आली नाही. करीता वरील वस्तुस्थिती लक्षात घेवून प्रकरणी मला शास्ती करु नये, ही विनंती."

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, सदर प्रकरणी आयोगाचे अंतरिम आदेश दिनांक ०५.०३.२०२६ रोजी निर्गमित करण्यात आले. सदर निर्गमित केलेल्या आदेशात विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली, ता. अहेरी जि. गडचिरोली यांनी द्वितीय अपील क्र. १९८८/२०२१ मध्ये दिनांक ०६.०६.२०२३ रोजी पारित केलेल्या आदेशाचे तंतोतंत पालन करुन आयोगाचे आदेश प्राप्त होताच ७ दिवसात तक्रारकर्त्यास तात्काळ विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी व त्याची पोच आयोगास सादर करावी, असे आदेशित करण्यात आले होते. सदर आदेशाचे पालन करीत विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली, ता. अहेरी जि. गडचिरोली यांनी दिनांक २०.०२.२०२६ च्या पत्रान्वये अपिलकर्ता, श्रीमती कल्पना वाघमारे यांना आयोगाने दिनांक १७.०२.२०२६ रोजी दिलेल्या निर्देशानुसार हवी असलेली मुद्दा क्र. २ ची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व तशी पोच आयोगास सादर केली आहे.

तसेच आयोगाने दिनांक ०५.०३.२०२६ रोजी निर्गमित केलेल्या अंतरिम आदेशात तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली, ता. अहेरी जि. गडचिरोली यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविण्यात आला होता. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, सामाजिक वनीकरण वृत्त नागपूर, श्री. आर. एस. सुकारे यांनी त्यांचा लेखी खुलासा दिनांक ०२.०४.२०२६ च्या पत्रान्वये आयोगास सादर केलेला असून त्यामध्ये त्यांनी कार्यालय अधीक्षक तथा जन माहिती अधिकारी आलापल्ली या पदाचा अतिरिक्त कार्यभार असल्याने व आयोगाचे दिनांक ०६.०६.२०२३ रोजीचे आदेश उपवनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांचे कार्यालयात प्राप्त न झाल्याने आयोगाच्या आदेशाचे

अनुपालन करणे शक्य झाले नाही, असे नमूद केले आहे. त्यामुळे **त्यांचे म्हणणे मान्य करीत झालेला विलंब क्षमापित करुन प्रस्तुत तक्रार अर्ज अंतिमत: नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

आदेश

प्रस्तुत तक्रार अंतिमत: नस्तीबध्द करण्यात येत आहे.

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : २२.०९.२०२६

जावक क्रमांक 6128 दिनांक 19 OCT 2026